**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नाशिक विभागीय मंडळ, नाशिक – ४२२००१**

---

द.नाविमं/संकीर्ण(माध्य)/प्रशिक्षण /२८२२
नाशिक ४२२००१
दिनांक : १६ /०१/२०२०

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

**विषय : –इ.११वी /इ.१२ वी च्या आरोग्य व शारीरिक शिक्षण,पर्यावरण व जलसुरक्षा या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेबाबत आयोजित करावयाच्या प्रशिक्षणाबाबत.**

संदर्भ :– रा.मं.चे पत्र क्र.रा.मं./पापुई/२/१०५ दिनांक ०७/०१/२०२०

उपरोक्त पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र (विद्या प्राधिकरण) व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व पाठयपुस्तक निर्मिती (बालभारती)पुणे यांच्याकडून शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून इ.११ वीचा अभ्यासक्रम व पाठयपुस्तके पुर्नरचित करण्यात आलेली असून,भाषा व भाषेतर या विषयांचे पुर्नरचित अभ्यासक्रमाच्या मूल्यमापन योजना,घटकनिहाय गुण विभागणी,नमुना प्रश्नपत्रिका,व उत्तरपत्रिका स्वरूप इ.बाबतचे राज्यस्तरीय,विभागस्तर ,जिल्हास्तर/तालुकास्तरावर शिक्षकांसाठी माहे सप्टेंबर/ऑक्टोंबर २०१९ मध्ये प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले होते. तथापि इ. ११ वी/इ.१२ वी च्या आरोग्य व शारिरीक शिक्षण,पर्यावरण व जलसुरक्षा या विषयांबाबत शासनाच्या पत्रानुसार सदर विषयांची मूल्यमापन योजना,घटकनिहाय गुण विभागणी,नमुना प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका स्वरूपइ. राज्य मंडळ स्तरावर तयार करण्यात आली असून,सदर विषयांची मूल्यमापन योजना,घटकनिहाय गुण विभागणी,तोंडी/प्रात्यक्षिक योजना राज्य मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सदर दोन्ही विषयांसाठी जिल्हानिहाय जिल्हास्तर प्रशिक्षण सकाळी ११ ते ५ या वेळेत खालीलप्रमाणे आयोजित केलेले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | विषय | दिनांक | प्रशिक्षण स्थळ |
|---|---|---|---|---|
| ०१ | नाशिक | पर्यावरण व जलसुरक्षा | २१/०१/२०२० | गुरूगोविंदसिंग ज्युनिअर कॉलेज, इंदिरा नगर ,नाशिक |
| | | आरोग्य व शारीरिक शिक्षण | २२/०१/२०२० | |
| ०२ | धुळे | पर्यावरण व जलसुरक्षा | २१/०१/२०२० | डॉ.पी.आर.घोगरे कनिष्ठ महा.धुळे |
| | | आरोग्य व शारीरिक शिक्षण | २२/०१/२०२० | |
| ०३ | जळगाव | पर्यावरण व जलसुरक्षा | २१/०१/२०२० | ॲड.एस.ए.बाहेती कॉलेज,खॉजामिया रोड,मणियार लॉ कॉलेज जवळ,जळगाव |
| | | आरोग्य व शारीरिक शिक्षण | २२/०१/२०२० | |
| ०४ | नंदुरबार | पर्यावरण व जलसुरक्षा | २१/०१/२०२० | श्रीम.हिं.गो.श्रॉफ ज्युनिअर कॉलेज,नंदुरबार |
| | | आरोग्य व शारीरिक शिक्षण | २२/०१/२०२० | |

तरी आपण सदर प्रशिक्षणासाठी आपल्या उच्च माध्यमिक शाळेतील एका विषयास ५ पर्यंत शिक्षक कार्यरत असतील तेथील एक शिक्षक व ५ पेक्षा जादा शिक्षक कार्यरत असतील तेथील ०२ शिक्षकांची प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी उपस्थित राहण्याबाबत आदेशित करावे. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील दोन्ही विषयांचे शिक्षक उपस्थित राहतील असे पहावे की जेणेकरून १०० टक्के उपस्थिती राहील असे पहावे. तसेच सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थ्यांना मंडळाकडून कोणताही प्रवास व दैनिक भत्ता अदा केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ नाशिक विभागीय मंडळ
नाशिक ४२२००१

Scanned by CamScanner